# शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

## “संविधान दिन” अंतर्गत व्याख्यान

## अहवाल

शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे दिनांक ९ डिसेंबर, २०२५ रोजी “संविधान दिन” या निमित्ताने विशेष आयोजन अत्यंत उत्साहपूर्ण व शैक्षणिक वातावरणात करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे मॅडम यांनी केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या माननीय प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम उपस्थित होत्या. कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून माननीय प्राध्यापिका प्रज्ञा जाधव मॅडम लाभल्या होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात माननीय प्रमुख पाहुण्या, माननीय प्राचार्य तसेच सर्व प्राध्यापकवर्ग यांच्या हस्ते दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. त्यानंतर माननीय प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम यांनी प्रमुख पाहुण्या माननीय प्राध्यापिका प्रज्ञा जाधव मॅडम यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन औपचारिक स्वागत केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बी.एड. प्रथम वर्षाच्या छात्राध्यापिका प्रणिता कदम यांनी सादर केले. त्यांनी संविधान दिन साजरा करण्यामागील उद्देश व संविधानातील मूल्यांचे महत्त्व स्पष्ट केले. त्यानंतर कार्यक्रमाच्या आयोजिका मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे मॅडम यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला.

यानंतर माननीय प्राध्यापिका प्रज्ञा जाधव मॅडम यांनी “संविधान दिन” या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान दिले. आपल्या व्याख्यानात त्यांनी भारतीय संविधानाची निर्मिती, त्यामागील मूल्ये, तसेच आजच्या सामाजिक जीवनात संविधानाचे महत्त्व यावर सविस्तर प्रकाश टाकला. त्यांचे व्याख्यान अत्यंत प्रेरणादायी व विचारप्रवर्तक ठरले.

यानंतर कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात माननीय प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम यांनी संविधानाचे महत्त्व, लोकशाही मूल्ये व जबाबदार नागरिक म्हणून आपली कर्तव्ये याविषयी प्रभावी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सुयोग्य व प्रभावी सूत्रसंचालन बी.एड. प्रथम वर्षाच्या छात्राध्यापिका वंदना रामनाथ वनवे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता व आभार प्रदर्शन प्रथम वर्षाच्या छात्राध्यापिका प्रियंका कांबळे यांनी केले.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवर्ग तसेच बी.एड. प्रथम व द्वितीय वर्षातील छात्राध्यापकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. संपूर्ण कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.




संविधान दिन अंतर्गत सरस्वती पूजन करताना माननीय प्रज्ञा जाधव मॅडम व सर्व प्राध्यापिकावृंद




महाविद्यालयाच्या माननीय प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम कार्यक्रमाला लाभलेले प्रमुख पाहुणे माननीय प्रज्ञा जाधव मॅडम यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना.




कार्यक्रमासाठी व्याख्याता म्हणून लाभलेल्या माननीय प्रज्ञा जाधव मॅडम यांचे योग्य असा परिचय करून देताना डॉ. नीलिमा मोरे मॅडम.




कार्यक्रमासाठी व्याख्याता म्हणून लाभलेल्या माननीय प्रज्ञा जाधव मॅडम मार्गदर्शन करताना.




बी.एड. प्रथम वर्षीय छात्राध्यापिका प्रणिता कदम मॅडम संविधान दिनाच्या अंतर्गत व्याख्यानाचे प्रास्ताविक मांडताना.




महाविद्यालयाच्या प्राचार्य सन्माननीय डॉ. रमा भोसले मॅडम मनोगत व्यक्त करताना.




प्रथम वर्ष छात्राध्यापिका प्रियंका कांबळे मॅडम आभार प्रकटीकरण करताना.




बी. एड. प्रथम वर्षाच्या छात्राध्यापिका वंदना वनवे प्रभावी सूत्रसंचालन करताना.







बी. एड. प्रथम वर्षाचे छात्राध्यापक सुनील चौधरी सर, भावेश वळवी सर यांनी सविधान दिनाच्या निमित्त केलेले फलक लेखन.

प्रथम वर्ष छात्राध्यापक यश पाटील यांनी या कार्यक्रमाला सुंदर अशी रांगोळी काढली होती.


शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल

(प्रथम वर्ष बी. एड. २०२५-२७)


संविधान दिनाच्या अंतर्गत व्याख्यान

कार्यक्रम पत्रिका

| | |
|---|---|
| दीपप्रज्वलन, सरस्वती पूजन, प्रतिमा पूजन | मा प्राचार्य आणि सर्व प्राध्यापक |
| मा. प्राचार्यांचे स्वागत | प्रा. डॉ. मोरे मॅडम |
| पाहुण्यांचे स्वागत | मा. प्राचार्य भोसले मॅडम |
| प्राध्यपकांचे स्वागत | प्रथम वर्ष बी. एड. छात्राध्यापक |
| प्रास्ताविक | प्रणिता कदम |
| पाहुण्यांचा परिचय | प्रा. डॉ. मोरे मॅडम |
| संविधान विशेषता आणि मूलभूत कर्तव्य यावर व्याखान | मा. प्रा. प्रज्ञा जाधव मॅडम |
| अध्यक्षीय मनोगत | मा. प्राचार्य डॉ. रमा भोसले मॅडम |
| आभार प्रकटीकरण | प्रियांका कांबळे |
| सूत्रसंचालन | वंदना वणवे |
| फोटो आणि व्हिडीओग्राफी | जयेश नडगे, विशाल फुफाणे |
| निमंत्रण पत्रिका, कार्यक्रम पत्रिका | अस्मिता बदे, दिधिती चुणेकर |

स्थळ- सरस्वती कक्ष वेळ- सकाळी ११. १५ वाजता

1


शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल.

बी. एड. वर्ष २०२५-२७

निमंत्रण पत्रिका

आपणांस कळविण्यात आनंद होत आहे की, ९ डिसेंबर २०२५ रोजी शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल येथे संविधान दिनाच्या अंतर्गत व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे, तरी यासाठी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

**व्याख्यानाचा विषय :-** संविधान विशेषता आणि मूलभूत कर्तव्य

**व्याख्याता :-** मा. प्रा. प्रज्ञा जाधव.

**आयोजक**
मा. प्रा. डॉ. नीलिमा मोरे

**अध्यक्ष**
मा. प्राचार्य. डॉ.रमा भोसले.

**प्रमुख उपस्थिती**

मा. प्रा. बिजली दडपे.

मा. प्रा. डॉ. प्रियांका सुभेदार मा. प्रा. डॉ. उज्वला डोणे.

स्थळ :- सरस्वती कक्ष वेळ :- सकाळी ठिक ११: १५ वाजता.